
मराठवाडा नेता दिनांक 30/12/2025

# दानपेटीसह काजू, बदाम चोरणाऱ्या चोरट्यास अटक

**नांदेड ( म. नेता)**



मागील अनेक दिवसापासून नांदेड शहर आणि जिल्ह्यातील मंदिरातील दानपेटी चोरण्याचे प्रमाण वाढले होते. जिल्हा पोलीस अधीक्षकांनी सर्व ठाणे प्रमुखांना याबाबत गुन्हे रोखण्याची तंबी दिली होती. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे फौजदार साईनाथ पुयड हे एका शोध मोहीमेवर भोकर उपविभागात जात असताना, माळटेकडी परिसरात एक इसम संशयिरित्या फिरताना दिसून आला. फौजदार पुय्यड यांनी त्या इसमाची अंग झडती घेतली असता,त्याच्याकडे लोखंडी रॉड, व रोख आठ हजार रुपये आढळून आले. याबाबत चौकशी केली असता तो उडवा उडवी चे उत्तरे देत होता. फौजदार पुयड यांना संशय बळावल्याने त्यांनी पॉलिसी खाक्या दाखवताच संशयित आरोपी सतीश रमेश जाधव याने सांगवी परिसरातील एका मंदिराचे प्रवेश द्वार तोडून दानपेटीतील तीन हजार रुपये चोरून घेतले असल्याची कबुली दिली. तसेच छत्रपती चौकातील एका दुकानाचे शटर वापरून हजार रुपये आणि काजू , बदाम आणि सीसीटीव्ही चा बॉक्स चोरले असल्याची कबुली दिली. पोलिसांनी मुद्देमाल जप्त केला असून आरोपीस अटक केली आहे.

यां प्रकरणी भाग्यनगर आणि विमानतळ ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.